**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक ३१ मे २०२६**

**ठळक बातम्या....**

**1. उष्णतेच्या लाटेत सर्वांना काळजी घेण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं मन की बात मधून आवाहन**

**2. खासदार क्रीडा महोत्सवाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि अभिनेते सुनील शेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रारंभ**

**3. राज्यात १० जून पर्यंत मान्सूनच्या आगमनाची शक्यता नसल्यानं शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये असं कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागांकडून आवाहन**

**4. आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि गुजरात टायटन्स यांच्यात अंतिम सामना**

**आता सविस्तर बातम्या ......**

**मन कि बात**

आकाशवाणीच्या मन कि बात या कार्यक्रमाद्वारे आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा १३४ वा भाग होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला त्यांनी नॅशनल सीनियर ॲथलेटिक्स फेडरेशन स्पर्धेत राष्ट्रीय विक्रम करणाऱ्या गुरविंदर सिंग आणि अनिमेष कुजूर यांच्याशी संवाद साधला आणि त्यांच्या विक्रमामागिल प्रेरणा समजून घेतली. देशात सध्या वाढत असलेल्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर सर्वांना काळजी घेण्याच आवाहन पंतप्रधानांनी केलं आहे. सतत पाणी पीत रहा, उन्हात शक्यतो बाहेर पडू नका आणि उन्हापासून बचाव करण्याच्या सरकारने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांच पालन करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

उन्हाळ्यातील खाद्यपदार्थांचा आणि पेयजलांचा देखील त्यांनी उल्लेख केला. देशातील वेगवेगळ्या ठिकाणच्या आंब्याच्या प्रजाती, उत्तर भारतातील सत्तूचे पिठ आणि कोकणातील सोलकढी आणि कोकम सरबताचा देखील त्यांनी उल्लेख केला. आपल्या अलिकडच्याच नेदरलँड्स भेटीत चोला काळातील प्राचीन ताम्रपट भारताला परत करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. केंद्र सरकार, देशाच्या अशा अमूल्य वारशांचं जतन संवर्धन करण्यासाठी सातत्यानं प्रयत्न करत असल्याचं ते

म्हणाले. ज्ञानभारतम अभियानांतर्गत लागलेल्या शोधांचाही त्यांनी उल्लेख केला. उत्तरप्रदेशातील मनोरमा नदी स्वच्छ करण्यासाठी झालेल्या जनचळवळीबद्दल देखील त्यांनी आजच्या मन कि बात मधून सांगितलं.

**जनरल एन.एस. राजा सुब्रमणी**

जनरल एन.एस. राजा सुब्रमणी यांनी आज देशाचे नवे संरक्षण दल प्रमुख म्हणून पदभार स्वीकारला. नवी दिल्लीत साऊथ ब्लॉक प्रांगणात त्यांना मानवंदना देण्यात आली.पाकिस्तान आणि चीनविषयक तज्ज्ञ, अशी ओळख असलेले जनरल सुब्रमणी, यापूर्वी राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयात लष्करी सल्लागार म्हणून कार्यरत होते.
दरम्यान ॲडमिरल कृष्णा स्वामिनाथन यांनी आज देशाचे २७ वे नौदल प्रमुख म्हणून पदभार स्वीकारला. ॲडमिरल दिनेश के. त्रिपाठी यांच्याकडून त्यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांना संबोधित केलं. देशाचं हित जपण्याप्रति, भारतीय नौदल सदैव सतर्क असून, प्रादेशिक सुरक्षेबाबत सध्याच्या आव्हानात्मक, जटिल, अनपेक्षितआणि अनिश्चित वातावरणात नौदल सक्रियपणे तैनात असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**अहिल्याबाई होळकर जयंती**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशतकोत्तर पहिल्या जयंतीनिमित्त त्यांना आज सर्वत्र अभिवादन करण्यात येत आहे. राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी मुंबईत लोकभवन इथं अहिल्यादेवींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. अहिल्याबाईंचं जन्मस्थान, अहिल्यानगर जिल्ह्यातल्या चोंडी इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत अभिवादन सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था - वनार्टीसह अमरावती आणि नागपूर विभागातही पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंतीनिमित्त विविध संस्थांद्वारे कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. देवी अहल्याबाई स्मारक समितीमार्फत नागपुरात अहिल्या बाईंच्या पुतळ्याला माल्यार्पण करून मानवंदना देण्यात आली तसेच रुद्राभिषेक आणि अखंड विष्णू सहस्त्रनाम घेण्यात आले.

**खासदार क्रीडा महोत्सव**

नागपुरात आज सकाळी यशवंत स्टेडियम इथं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि अभिनेते सुनील शेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत खासदार क्रीडा महोत्सवाचं उद्घाटन झालं. त्यानिमित्त मॅरेथॉन दौड आयोजित करण्यात आली होती. क्रीडा आणि आरोग्याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित या मॅरेथॉनमध्ये नागरिक, युवक आणि क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. आठ दिवस चालणाऱ्या या महोत्सवात १८ क्रीडा प्रकारांत 23 हजार 800 खेळाडू सहभागी होणार आहेत. 571 चषकं, 6 हजार 700 पदकं आणि सुमारे 57 लाख रुपये बक्षिसांचं वितरण या दरम्यान होईल.

**विषारी दारू**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसराला हादरवून सोडणाऱ्या विषारी दारू प्रकरणातील मृतांचा आकडा आता 24 वर पोहोचला आहे. हडपसरमधील काळेपडळ परिसरात आणखी दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने मृतांची संख्या 24 वर पोहोचली असून फुगेवाडी, उरुळी कांचन आणि इतर भागांतही मृत्यूंची नोंद झाली आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत राज्य सरकारने तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपवला आहे. तपासासाठी सीआयडीची पाच विशेष पथके नियुक्त करण्यात आली आहेत. दरम्यान, कर्तव्यात निष्काळजीपणा आणि पर्यवेक्षणाचा अभाव असल्याचा ठपका ठेवत पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली.

**अवैध हातभट्टी दारु**

भंडारा जिल्हयात 'ऑपरेशन फ्लश आऊट' अंतर्गत दारूच्या अवैध हातभट्ट्या, वाहतूक आणि विक्री करणाऱ्यांविरुध्द विशेष मोहीम राबविण्यात आली. जिल्हयातील विविध भागांमधे छापेमारी आणि शोधमोहीम राबवुन एकाच दिवशी ३२ गुन्हे नोंदविण्यात आले तसच ३१ लाख किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**जागतिक तंबाखू विरोधी दिवस’**

तंबाखूच्या सेवनापासून असलेल्या धोक्यांविषयी जागृती निर्माण करण्यासाठी आज ‘जागतिक तंबाखू विरोधी दिवस’ पाळला जात आहे. तंबाखू सेवन पूर्णपणे

थांबवण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेनं हाती घेतलेला हा जागतिक कार्यक्रम आहे. 'आकर्षणाचा मुखवटा उतरवू- निकोटीन आणि तंबाखूच्या व्यसनावर मात करू', ही यंदाच्या या दिवसाची संकल्पना आहे. जागतिक तंबाखू निषेध दिनानिमित्त 21 महाराष्ट्र एनसीसी बटालियन, वर्धा अंतर्गत देवळी येथील SSNJ महाविद्यालयातील एनसीसी भवन येथे "तंबाखूच्या सेवनाने आरोग्यावर होणारे दुष्परिणाम" या विषयावर पोस्टर मेकिंग स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं . तंबाखूच्या व्यसनामुळे होणारे गंभीर आरोग्यविषयक दुष्परिणाम समाजापर्यंत पोहोचवून जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

**हवामान**

काल विदर्भात अनेक ठिकाणी झालेल्या मान्सूनपूर्व पावसामुळे कमाल तापमानात घट झाली आहे. आज सकाळी अकोला जिल्ह्यात मेघगर्जनेसह हलक्या पावसाच्या सरी कोसळल्या. बुलडाणा जिल्ह्यातही काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. यामुळे खामगाव,शेगाव आणि संग्रामपूर परिसरातल्या पपई, केळी यासारख्या बागायती पिकांचे मोठे नुकसान झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.अमरावती जिल्ह्यातील वरूड तालुक्यामध्ये काल झालेल्या गारपीटीमुळे आंबिया बहार संत्राच्या हजारो हेक्टर क्षेत्राचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाल आहे. नुकसानीचे सर्वेक्षण करुन तात्काळ अनुदान वाटप करण्याबाबत मोर्शी विधानसभा मतदार संघाचे आमदार देवेंद्र भुयार यांनी मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली आहे.

**मान्सून निर्देश**

सध्या राज्यातील हवामानात बदल होण्यास सुरुवात झाली आहे. प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि खानदेशात दुपार नंतर ढगाळ हवामान आणि काही प्रमाणात वादळी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. मात्र या वादळी पावसाचा मान्सूनशी काहीही संबंध नाही. सध्याच्या स्थितीनुसार राज्यातील बहुतांश भागांमध्ये किमान १० जून पर्यंत मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये असं आवाहन कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागांकडून करण्यात आलं आहे. विजेच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी स्वतःची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. अशा वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे अशा सूचना विभागाने जारी केल्या आहे.

**आयपीएल**

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि गुजरात टायटन्स यांच्यात अंतिम लढत होणार आहे. गुजरातमध्ये अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी स्टेडिअमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

********